# निशाणी क्र. ४९ वरील आदेश

प्रतिवादी क्र. १०, ११, १३, १४ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरूध्द् झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे म्हणण्यानुसार, प्रस्तूत दाव्यातील प्रतिवादी क्र. १०,११,१३,१४ यांनी दाव्याचे कामकाज चालविण्याकरीता त्यांची मुखत्यार नेमणूक केली आहे. सदर नेमणूक झाल्यानंतर विधिज्ञांनी दाव्याचे कागदपत्र पाहिले असता प्रस्तूत प्रतिवादींविरुध्द एकतर्फा आदेश केला असल्याबाबतची माहिती त्यांना दिली. सदर प्रतिवादी हे मुंबईला राहात असल्याने दाव्याच्या नेमल्या तारखेस हजर राहू शकलेले नव्हते. प्रस्तूतचा दावा वाटपाचा असल्याने सदर दाव्याच्या कामी सहहिस्सेदार म्हणून प्रतिवादी क्र. १०,११,१३,१४ यांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायाकरीता आवश्यक व जरुरीचे आहे. प्रस्तूत दाव्यातील प्रतिवादींना अद्याप बजावणी व्हायची आहे. तरी प्रतिवादी क्र. १०,११,१३,१४ यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येवून कैफियत देणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादींनी केली आहे.

२. वादींनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जात नमूद कारण खोटे व खोडसाळ व काल्पनिक आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा. मंजूर करणेचा झाल्यास जास्तीत जास्त दंड आकारण्यात यावा अशी विनंती प्रस्तूत वादीने केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १०,११,१३,१४ आणि वादी तर्फे विद्वान विधिज्ञांचा

युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर दावा वाटपाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. १०,११,१३,१४ यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयाचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. मात्र झालेल्या विलंबाबाबत प्रस्तूत प्रतिवादींनी खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

## <u>आदेश</u>

१. प्रस्तूतचा अर्ज रक्कम रू. ४००/– च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो. प्रतिवादी क्र. १०,११,१३,१४ यांनी रक्कम रुपये ४००/– वादी यांना दयावेत.

स्थळ : देवगड ( बी.आर.पाटील )
दिनांक: १७/०२/२०२१ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2021.02.18 11:17:45 +0530